# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक 25.10.2010 (का.प.क्रं.8) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक 25 ऑक्टोबर 2010 (का.प.क्रं.8) रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 01.05 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.आगा खान मीयॉ खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

श्री.जगदिश सिध्द : सर्वप्रथम चर्चा घेण्यात यावी त्यानंतर विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात यावी. वर्तमानपत्रात सकाळ, सामना, तरूणभारत, पुण्यनगरी, आनंदनगरी बातमी आली आहे की, पदाधिकाऱ्यांच्या अंर्तगत वादामुळे विकास कामांना खिळ खुलासा करण्यात यावा की, पदाधिकाऱ्यांमध्ये मा.महापौर, उपमहापौर, सभापती, विरोधी पक्षनेता कुठला वाद/मतभेद आहे. पालिकेतील राजकारण गलिच्छ व खालच्या स्तराचे पदाधिकाऱ्यांची बदनामी करण्याचा भावनेतुन अशा प्रकारच्या बातम्या दिल्या आहेत का? सर्व जनतेमध्ये भ्रम निर्माण झालेले आहे. मनपामध्ये 35 टक्के कर्मचारी कामचुकार अशा प्रकारचे बातम्या आलेल्या आहेत. मा.आयुक्त यांचे स्टेटमेंट पेपरमध्ये छापून आलेले आहे. सदरील बातमीचा खुलासा करण्यात यावा. बातमी वाचून मी निराश झालो.

मा.सभापती :पदाधिकाऱ्यांमध्ये वाद, पदाधिकाऱ्यांमुळे विकास कामे होत नाही अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रामध्ये आली आहे. माझ्या माहितीप्रमाणे विकास

कामामध्ये कुठल्याही पदाधिकाऱ्यामध्ये नगरसेवकांत मतभेद/वाद नाही. मा.आयुक्तांनी या संदर्भात सविस्तर खुलासा करावा.

मा.आयुक्त : वृत्तपत्रात बातम्या आलेल्या आहेत. यासंदर्भात काल एक मराठवाडा विकास परिषदे मार्फत शहराच्या समस्या, मराठवाडयाच्या विकासाबाबत योगदान या संदर्भातील कार्यशाळा आणि यातुन काही इश्यु फ्रेम करण्याचा त्यांचा मानस होता. त्या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. शहरातील विकासाबाबत चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्याबाबतीत मलाही बोलावण्यांत आले होते. शहरातील कामकाजाबाबत, काय करण्याची गरज आहे, कुठे आम्ही आहोत, अशा चौफेर विषयावर बोललेलो आहे. हया सर्वाची जबाबदारी माझ्या वर घेतलेली होती व आहे कामाची जबाबदारी प्रशासकीय हेड म्हणुन माझ्यावर आहे. काम चांगले झाले पाहिजे कामाला गती दिली पाहिजे. हा प्रयत्न करीत आहे. सर्वांना सोबत घेऊन काम करीत आहे. ज्या पध्दतीने ज्या गतीने काम चाललेले आहे त्यावर मी समाधानी नाही असा प्रामाणिक विचार मांडण्यात आला. कामे कशामुळे होत नाही कुठल्या अडचणी आहेत. कामाच्या गतीबाबत सर्व जबाबदार आहे असे माझे मत होते. शहरातील नागरीकही साथ देत नाही. अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले आहे. अधिकारी कर्मचारी काम म्हणावं तसं करीत नाही. अनेक अधिकारी,कर्मचारी बिनकामाचे आहेत. असे प्रामाणिकपणे म्हटलेले आहे. पदाधिकाऱ्यांमुळे विकास खुंटला एवढयापुरता मुद्दा नव्हता. विकास कमी पडल्याबाबत सर्वच घटक जबाबदार आहेत. सर्वांना काम करण्याची गरज आहे. परंतु वर्तमानपत्राने आपल्यापरिने अर्थ काढुन वेगळया पध्दतीने बातमी दिली आहे. ज्या ठिकाणी कार्यक्रम झाला आहे त्या ठिकाणची पूर्ण चर्चा वाचावी त्या पाठीमागची भुमिका अशी होती शहरासाठी काम करणे हे आमचे कर्तव्य आहे, यास आणखी गती दिली पाहिजे. आपआपसातील भेद असलेतरी ते दुर ठेवुन कामांना गती दिली पाहिजे पुढे गेले पाहिजे. असा सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता. कदाचित त्यातील एक बाब उचललेली गेली असावी. पदाधिकारी नगरसेवकांवर टिका करण्याचा कुठलाही हेतु नव्हता. प्रत्येकाने आपआपली जबाबदारी ओळखुन प्रत्येक घटकाने मराठवाड्यच्या राजधानी, पर्यटन शहर यास हातभार लावावा पुढे येणारी औद्योगिक गुंतवणूक, उद्योगधंदे यांना वाढ देण्याच्या दृष्टीने आमच्या कामाच्या माध्यमातुन समाजासमोर चांगले चित्र जावे अशा प्रकारची भावना असल्याने यापध्दतीने बोललेलो आहे. कालच्या कार्यक्रमाचे रेकॉर्डींग ऐकु शकता वर्तमानपत्रात बातमीला वेगळे अँगल दाखविलेले आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :35 टक्के कर्मचारी काम करीत नाही ही आमची जबाबदारी नाही. जे स्टेटमेंट दिलेले आहे ते चुकीचे आहे. पदाधिकाऱ्यांवर आरोप केले ते चुकीचे आहे.

श्री.जगदिश सिध्द :वर्तमानपत्रावर कारवाई करणार आहे काय?त्यांचेवर गुन्हा दाखल करणार का.महानगरपालिका अधिकारी, पदाधिकारी यांची बदनामी केलेली आहे.

मा.आयुक्त :मा.सुप्रीम कॉर्टाच्या आदेशाप्रमाणे रॅम्केला काम दिले आहे. रॅम्केने काम केले नाही काम सुधारणा करण्याची गरज आहे. ही बातमी वर्तमानपत्रात आली नाही. वर्तमानपत्रात रॅम्केचे काम चांगले आहे म्हणून आले आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :रॅम्केला फक्त पैसे द्यायचे का?

मा.सभापती :मा.आयुक्तांनी खुलासा केलेला आहे की, जे बोललेले आहे त्यातील काही भाग वर्तमानपत्राने घेतलेला आहे. व्हिडीओ चित्रीकरण बघण्यात यावे. अशा प्रकारच्या बातम्या येवु नये याची प्रशासनाने दखल घ्यावी. विकास कामांसाठी सर्व पदाधिकारी एकत्र आलेले आहेत. मा.महापौर, उपमहापौर, सभापती, विरोधीपक्षनेते हे सर्व मिळुन वसुलीकरीता बैठक घेण्यात येत आहे. बातमी देतांना अशा प्रकारचे शब्द टाळण्यात यावे जेणे करून संस्थेची, पदाधिकारी, अधिकारी यांची बदनामी होणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या प्रभागात मा.आमदार श्री.विलास अवचट साहेब यांचे निधीमधील जो हॉल बांधलेला आहे. गेल्या दिड वर्षापासुन त्यासंदर्भांत पाठपुरावा करीत आहे. मा.आयुक्तांना यासंबधी माहिती आहे. तत्कालिन स्थायी समिती सभापती श्री.अब्दुल साजेद असतांना ठराव झालेला आहे की, कमीत कमी भाडे आकारण्यात यावे. परंतु संबधीत अधिकारी यांना सदर बाबीचा बोध होत नाही. संचिका या विभागातुन त्या विभागात प्रलंबित राहत आहे. मा.सभापती यांना विनंती करण्यत येते की, त्यांनी Specific रूलिंग देण्यात यावी. ज्या पध्दतीने इतर भागातील सभागृह एक हजार रूपये दराने भाडेतत्वावर दिले त्याच पध्दतीने भाडयाने देण्यात यावे. मागील स्थायी समितीने त्या संदर्भांत ठराव झालेला आहे Specific 1000 रूपये भाडे बाबतचा उल्लेख झाला पाहिजे. तरी विनंती आहे की, स्पष्ट शब्दात रूलिंग देऊन सदरील संस्थेस हॉल भाडे तत्वावर देण्यात यावा.

श्री.विकास जैन :मागील बैठकीत बन्सीलाल नगर येथील सभागृह श्री.स्वामी समर्थ केंद्रास अशाच पध्दतीने भाडयाने दिलेले आहे. प्रशासकीय ठरावास मंजूरी झालेली आहे परंतु आत्तापर्यंत त्याचे ॲग्रीमेंट होत नाही. मा.स्थायी समितीची रूलिंग झाल्यानंतरही संचिका प्रलंबित आहे. स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांचा विषय आणि हा विषय एकच आहे. दोन्हीसाठी लागू झाला पाहिजे.

श्री.अमित भुईगळ :वार्डातील नागरीकांसाठी आजुबाजूला लग्नकार्यासाठी मंगल कार्यालय नाही. नेहरू भवन येथील बाहेरील ग्राऊंड लग्नकार्यासाठी देण्यात येत होते. मालमत्ता विभागाकडून एक ते दोन हजार रूपये भाडे आकारणी करण्यात येत होती. परंतु प्रशासनाने लग्न कार्यासाठी नेहरू भवन येथे बंदी घालण्यात आलेली आहे. सदरील ठिकाणी दलित आणि मुस्लीम समाजातील मुलामुलींचे लग्नकार्य होत असतात. नेहरू भवन येथील ग्राऊंड लग्नकार्यासाठी देण्यात यावे. जे भाडे आहे ते भरण्यास नागरीक तयार आहेत. पुर्वीप्रमाणे नेहरू भवन येथील ग्राऊंड भाडयाने देण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयानुसार प्रशासनास मागील बैठकीत रूलिंग देण्यात आली होती. पिया मार्केटमध्ये सर्वात जास्त निवीदा आली असेल रेट आला असेल त्या रेटने दुकाने देण्यात याव्येत. अधिकारी पुन्हा

निवीदा काढुन दुकाना भाडयाने देण्यात येतात. सभागृहाच्या बाबतीत रूलिंग देण्यात आली होती की, कमीत कमी दराने देण्यात यावे. परंतु प्रशासनाच्या मते स्पष्ट उल्लेख केला नसल्यामुळे संचिका प्रलंबीत ठेवण्यात आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स्थायी समिती सभेत अपंग इसमाचे पैसे परत करण्याचे आदेश देण्यात आले होते. संचिका सुरू झाल्यावर संबधीत विभागातील एका अधिकाऱ्यांनी लिहले अशा प्रकारचा जी.आर आहे. जी.आर असता तर स्थायी समितीमध्ये कशासाठी आले असते. रूलिंग दिल्यावर कार्यवाही केली जात नाही.

मा.सभापती :स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांच्या वार्डातील जो हॉल आहे तो 1000/- रूपये प्रतीमहा दराने भाडयाने देण्यात यावे. नेहरू भवनच्या लगतची खुली जागा त्या ठिकाणी लाकांना कार्यक्रमासाठी उपलब्ध करून द्यावे. कमीत कमी चार्ज घेऊन कार्यक्रमासाठी उपलब्ध करून देण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :शहरातील जनता बस सेवा बंद असल्याने अडचणीत आलेली आहे. शासनाला एनओसी पाठविलेली आहे का? खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :कॉमनवेल्थ गेमसारखी स्थिती केली आहे. जनतेसाठी बससेवा उपलब्ध करून देऊ परंतु दुर्देवाने अजुनही राज्य परिवहन महामंडळाला एनओसी मिळालेली नाही. शहरातील नागरीकांना, विद्यार्थ्यांना,हाल अपेष्टा सोसाव्या लागतात. गोरगरीब कामगार, यांना याचा विपरीत परिणाम भोगावा लागत आहे. सणासुदीचे दिवस असल्याने ताबडतोब राज्य परिवहन महामंडळास एनओसी देऊन जनतेला सुविधा देता येईल यापध्दतीने कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा आहे.

मा.सभापती :मा.महापौर यांचे दालनात राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी यांना बोलावुन एनओसी दिलेली आहे. पुढील कार्यवाही त्यांचे स्तरावर चालु आहे. दिवाळीपुर्वी शहर बससेवा सुरू होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :नागरीक याबाबतीत वारंवार विचारणा करतात. विनंती आहे की, संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून शहर बससेवा केव्हा सुरू करणार याबाबत माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती : आपण त्यांना ना-हरकत देण्यापूर्वी त्यांचेकडून मान्य करून घेण्यात आले की, दिवाळीपुर्वी किमान 50 बसेस सुरू करणार आहे.

सौ.साधना सुरडकर :वार्डात श्री.श्रीकांतजी जोशी यांचे निधीतुन हॉल बांधण्यात आलेला असुन त्याची स्थिती खराब झालेली आहे. संस्थेला हॉल भाडयाने द्यावा म्हणून ठराव मंजूर झालेला आहे परंतु पुढील कार्यवाही थांबलेली आहे. संचिका आहे त्या स्थितीत आहे. मयुरबन, मधुबन कॉलनी येथे गेल्या तीन वर्षापासुन हॉलचे कंन्स्ट्रक्शन करीत आहोत. परंतु काम बंद अवस्थेत आहे ते का बंद आहे याचे कारण माहिती नाही. गेल्या तीन वर्षापासुन हॉलचे बांधकाम अर्धवट स्थितीत आहे. मनपाच्या निवडणुकीच्या पूर्वी पासून मागणी करत आहे. नवरात्र गणेश उत्सवाच्या काळात तेथील नागरीकांनी बांधकामाबाबत जोर धरलेला आहे. तरी तात्काळ हॉल बांधुन देण्यात

यावा. बजेटबुकमध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. बांधकाम का होत नाही याबाबतची चौकशी करून संबधीत कंत्राटदाराला काम सुरू करण्यास सांगण्यात यावे.

मा.सभापती :पहिल्या मुद्दयाबाबत हॉल कमीत कमी दरात देण्यात येईल. प्रतिमहिना 1000 रूपये भाडयाने देण्यात येईल. हॉलचे काम बंद अवस्थेत का आहे खुलासा करण्यात यावा. संबधीत कंत्राटदाराने हॉलचे काम तातडीने सुरू करावे. तेथील काय अडचण आहे, खुलासा करा. अडचण नसेल तर काम त्वरीत सुरू करावे.

सौ.साधना सुरडकर :सदरील कंत्राटदार काम करण्यास तयार नसेलतर दुसऱ्या कंत्राटदाराला काम देण्यात यावे.

श्री.विकास जैन :आरोग्य विभागातील 40 पदे भरण्याबाबत शासनाकडुन आदेश आलेले होते का? तसेच सदरील 40 पदे भरलेली आहेत का?

मा.सभापती :आरोग्य अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.विजय वाघचौरे :वार्ड ड मध्ये इंजिनिअर देण्याबाबत आदेशित केले होते त्याबाबतीत कुठलीच कार्यवाही झालेली नाही.

आरोग्य वै.अधिकारी :आरोग्य विभागातील रिक्त भदे भरण्याची कार्यवाही अस्थापना विभागाकडून केली जाते. अद्यापपर्यंत पदे भरलेली नाही. ते भरणे आवश्यक आहे.

अस्थापना अधिकारी-1 :आरोग्य विभागाची रिक्त पदांची जाहिरात तयार केलेली आहे. जाहिरात पुटअप करणार आहे. आरसीएच संदर्भात 16 मे 2008 रोजी 38 पदे मंजूर केलेली आहे. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर जे कर्मचारी आरसीएचवर कार्यरत आहे त्यांचेमधून हि पदे भरण्यात यावी म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे. ती पदे महानगरपालिकेने भरलेली आहे.

श्री.विकास जैन :पदे भरतांना काही प्रोसिजर असेल. कुठलेही शासनाने मंजूर केलेली पदे भरतांना प्रोसिजर असेल. First Cum First असे काही आहे काय? पदे भरण्याची पध्दत काय आहे.

अस्थापना अधिकारी-1 :नविन पदे भरायची असल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 54 (1) अन्वये कमिटी गठीत करण्यात येते. कमिटीमध्ये मा.आयुक्त किंवा त्यांनी पदनिर्देशित केलेले अधिकारी, उपआयुक्त, संबधीत विभागाचे खाते प्रमुख, कमिटी नियमानुसार निवड करून नियुक्ती आदेश देण्यात येते.

श्री.विकास जैन :लोकांना कसे माहित पडते की, येथे पदे भरायची आहे.

अस्थापना अधिकारी :वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येते.

श्री.विकास जैन :पदे भरण्याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती का?

अस्थापना अधिकारी :आरसीएच फेस 1 मध्ये आरोग्य विभागामार्फत पदे भरली गेली.

श्री.विकास जैन :आरसीएच कॉन्ट्रॅक्ट होता, तो संपलेला आहे.राज्य शासनाने जी पदे मंजूरी दिलेली आहे तो आरसीएच कॉन्ट्रॅक्टमध्ये नाही.

अस्थापना अधिकारी :शासन जी.आर. मध्ये स्पष्ट दिलेले आहे. जे आर.सी.एच. मध्ये महानगरपालिकेत कार्यरत आहे. त्याच लोकांना सामावून घेण्यासाठी.

श्री.विकास जैन :राज्य शासनाचा जीआर वाचून दाखविण्यात यावा नावानिशी मंजूरी दिलेली नाही.

अस्थापना अधिकारी :दिनांक 16 मे 2008 चा शासन निर्णय आहे.

प्रस्तावना :

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी युरोपियन कमिशनच्या अर्थसहाय्याने प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रम (RCH) मंजूर करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेने 5 रूग्णालयांना श्रेणीवर्धीत करून त्यासाठी 17 वैद्यकीय अधिकारी व इतर अशी एकुण 40 पदे निर्माण करण्यात आली होती. सदरील पदांवर करार पध्दतीने या कार्यक्रम कालावधीसाठी नियुक्त्या केल्या होत्या. या (RCH) प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता निर्मित पदांसाठीच्या अनुदानाची मुदत 31.03.2007 रोजी संपुष्टात आल्यानंतर महानगरपालिकेने सदरील प्रकल्प पुढे चालु ठेवून या पदावरील व प्रकल्पांवरील खर्च करण्यास तयारी दर्शवून तसा ठराव पारित केला आहे. त्यानुषंगाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी या कार्यक्रमासाठी निर्माण केलेली आवश्यक ती पदे नियमितपणे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. त्याबाबत संचालक, आरोग्य सेवा / सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय घेवून नियमित पद निर्मितीसाठी लागणारा कालावधी पाहता. या पदावर कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांचे वेतनाचा/मानधनाचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियमित पदनिर्मितीस मान्यता मिळेपर्यंत संबंधित पदावरील कर्मचाऱ्यांना सद्याचे दराने मानधनावर/ठोक वेतन पध्दतीने वेतन अदा करण्यास समक्रमाकांचे दिनांक 23 जानेवारी 2008 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण पुणे यांचे दिनांक 13.03.2008 रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेऊन आणि जननी सुरक्षा योजना, तसेच माता व बाल मृत्यू दरांचे प्रमाण कमी करणे या दृष्टीने राज्याच्या शहरी भागातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील, प्रजनन व बाल आरोग्य या बाबींचे अनन्य साधारण महत्व विचारात घेवून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य विकासासाठी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाची अमंलबजावणी पुढे ठेवण्यासाठी आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मनपा आस्थापनेवर विविध संवर्गातील 40 कायम पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

औरंगाबाद महानगरपालिका विषय क्रं. 655/4, दिनांक 11.01.2007 अन्वये पारित ठरावानुषंगाने, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत विहीत पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका अस्थापनेवर सामावून घेण्यासाठी आरोग्य

सेवे अंतर्गत महानगरपालिका अस्थापनेवर विविध संवर्गातील 40 पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम नियमितपणे राबविण्यासाठी मनपाने विषय क्रमांक 655/04 दिनांक 11.01.2007 अन्वये पारित केलेला महासभा ठरावानुषंगाने आयुक्तांनी सादर केलेला प्रस्ताव व अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा, पुणे यांचे अभिप्राय विचारात घेवून, औरंगाबाद मनपाच्या आस्थापनेवर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे विविध संवर्गातील 40 पदे निर्माण करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949च्या कलम 51(4) मधील तरतुदीस अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

या पदनिर्मिती अनुषंगाने सर्व संविधानिक बाबीची पुर्तता आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी करून तसा अहवाल शासनास सादर करावा.

श्री.विकास जैन :नियमाप्रमाणे म्हणजे काय? नावानिशी आदेश आलेले आहेत काय?

अस्थापना अधिकारी :औरंगाबाद मनपाच्या आस्थापनेवर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी.

श्री.विकास जैन : भरती नियम काय आहे.

अस्थापना अधिकारी : कलम 54 (1) सांगितले आहे. विहीत पध्दतीने, जाहिरात देवुन नियुक्त केलेले आहे.

श्री.विकास जैन :पगार काय देतो.

अस्थापना अधिकारी :शासनाच्या स्केलनुसार पगार देण्यात येतो.

श्री.विकास जैन : मानधनावर घेतलेले होते.

अस्थापना अधिकारी :शासनाने बंद केले होते त्यावेळेस मानधन देत होतो. विहीत पध्दतीने ज्यांना सामावुन घेतलेले आहे.

श्री.विकास जैन :मानधनावर घ्यायचे आहे की, स्केलवर घ्यायचे आहे.

अस्थापना अधिकारी :शासन निर्णयात स्केलवर घेण्याबाबत सांगीतलेले आहे.

श्री.विकास जैन :शासनाने 40 लोकांची नांवे दिलेली नाही.

अस्थापना अधिकारी :कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विहीत पध्दतीने नियुक्त.

श्री.विकास जैन :जी.आरमध्ये स्पष्टपणे आहे की, नियमाप्रमाणे भरती करण्यात यावी.

अस्थापना अधिकारी :नियमाप्रमाणे भरती केलेली आहे.

श्री.विकास जैन :वर्तमानपत्रामध्ये जाहिरात का देण्यात आली नाही.

अस्थापना अधिकारी :जी.आरमध्ये जे कार्यरत आहे त्यांना सामावुन घेण्यासाठी सांगीतलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आरसीएचमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची संख्या माझ्या माहितीनुसार 200 ते 250 आहेत. यापैकी फक्त हे 40 अधिकारी/ कर्मचारी का घेतले त्यासाठी कुठली पध्दत स्विकारली हा प्रश्न स.सदस्यांचा आहे. 40 कर्मचाऱ्यांना घरी जाऊन बोलावले असेल, उर्वरित

कर्मचाऱ्यांना कसे कळणार की, महानगरपालिकेत मानधनावर घेतलेले होते आता स्केलवर घेणार आहे कायम करणार आहे ही माहिति त्यांना होणे गरजेचे आहे. यासाठी काय केले ते सांगण्यात यावे.

अस्थापना अधिकारी-1 :जीआरमध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. आरसीएच फेसवन मधील कर्मचाऱ्यांना घेतलेले आहे.

श्री.विकास जैन :सदरील कर्मचाऱ्यांचे शासन निधी/पैसे देणार आहे का? सदरचा बोझा हा महानगरपालिकेवर पडणार आहे. आरसीएच कॉन्ट्रॅक्टवर कर्मचारी कार्यरत होते त्यांचे कामाची गॅरंटी कुणी देऊ शकतो काय? एकाही आदेशमध्ये कर्मचाऱ्यांचे नांव देण्यात आलेले नाही. हे 40 कर्मचारी का दुसरे कर्मचारी का नाही. यांचेच आदेश का काढले.

अस्थापना अधिकारी-1 : जेष्ठतेप्रमाणे नियुक्ती दिली आहे. कमिटीच्या समोर जेष्टता यादी सादर केली होती.

श्री.विकास जैन :जे आदेश काढण्यात आले त्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली आहे का. कुठलीही नियुक्ती, पदोन्नती बाबत माझ्या माहितीप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेच्या समोर आणावे लागते.

अस्थापना अधिकारी-1 :655/04 अन्वये मान्यता दिलेली आहे.

श्री.विकास जैन : कार्यालयीन आदेशात पदांना मंजूरी दिलेली आहे का. पदे मंजूर केली.

श्री.रेणुकादास वैद्य : नियुक्ती दिलेल्याच 40 कर्मचाऱ्यांना घेण्यात यावे म्हणुन आदेशात किंवा ठरावात म्हटलेले नाही. या 40 जणांना का म्हणुन घेण्यात आलेले आहे. त्या 40 लोकांचे कागदपत्र तपासले आहे. नावानिशी सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आरसीएच्या 250 पैकी 40 जणांना नियुक्ती दिली बैठकीत यास मंजूरी घेण्याची गरज आहे काय नेहमीप्रमाणे कार्योत्तर मंजूरी का नाही घेण्यात आली. खुलासा करण्यात यावा. याची गरज आहे की, नाही.

श्री.विकास जैन :पदे भरल्यानंतर मान्यतेस्तव सभेपुढे ठेवावे लागते. माहितीस्तव तरी ठेवावे लागते. आदेशात 40 जणांची नांवे असल्यास माझी काहीही हरकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : 40 पदांना मान्यता दिली ही मंजूरी शासनाने दिली या 40 लोकांना 54 (1) प्रमाणे समिती गठीत करून समितीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या यादीला सभागृहाची मान्यता घ्यायला हवी होती. अशी तरतुद आहे काय?

अस्थापना अधिकारी-1 :मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव झालेला आहे. शासनाने मंजूरी दिली.

श्री.विकास जैन : 40 लोकांची नांवे दिलेली नाही. आपण 40 लोक ठरवले त्याची मान्यता घेतली आहे का. शासनाचे नांव घेवू नका. पदांची जाहिरात का देण्यात आली नाही. 40 जणांची नांवानिशी मान्यता घेतलेली आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य :नियुक्तीच्या वेळेस एखादयावर अन्याय होवु शकतो. आरक्षणाचा प्रश्न येवु शकतो. मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याची गरज आहे किंवा नाही खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :दोन ते तीन जणांची कमिटी स्थापन करून चौकशी करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वसाधारण सभेमध्ये पॉलिसी ठरवून घ्यायची सर्वसाधारण सभेचे सर्व अधिकार काढून घ्यायचे. मा.आयुक्त, मा.महापौर यांना द्यायचे हरकत

नाही. 54 (1) खाली समिती गठीत केली त्यासही हरकत नाही. परंतु ज्यावेळेस 250-300 लोकांपैकी 40 लोकांचे सलेक्शन करतात. काही चिरीमीरी घेऊन 40 जणांना नियुक्त्या दिल्यात का? तसा काही प्रकार झालेला आहे का? आमची विनंती आहे की 99 सदस्यांचे सभागृह आहे 99 जणांच्या समोर सभागृहात यादी ठेवुन ती योग्य आहे किंवा नाही हे ठरवु द्या. चिरीमिरी घेऊन नियुक्त्या केल्या असतील, नातेवाईक असतील. आम्हालाही कळवु द्या की बरोबर आहे किंवा नाही. सभागृहाची मंजूरी न घेता नियुक्तीची अधिकार दिले आहेत का? असे कोणी म्हटले आहे का कुठल्याही सभागृहाची मान्यता/मंजूरी न घेता नियुक्ती आदेश काढायचे. कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक होते.

श्री.विकास जैन :कार्यात्तर मंजूरीसाठी ठेवल्यास कुठला नविन अधिकारी/कर्मचारी महापालिकेत आले आहे याची माहिती मिळते.

मा.सभापती :स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहे त्यासंबधी मुख्यलेखापरिक्षक व उपअभियंता श्री.काझी यांची चौकशी समितीवर नियुक्ती करण्यात येते त्यांनी प्रत्येक बाबींची तपासणी करून येणाऱ्या स्थायी समितीमध्ये अहवाल ठेवण्यात यावा.

श्री.महेश माळवतकर : 15 दिवसापूर्वी गेल्या सर्वसाधारण सभेमध्ये अर्थसंकल्प आणि एएमटी शहर बस वाहतुक विषयी सभा आयोजित केलेली होती. आपले कर्तव्यदक्षपणामुळे सगळे विभाग परस्पर निर्णय घेत आहे. मा.महापौर, मा.सभापती यांना एखाद्या विषयाची माहिती सांगण्याची कोणत्याही विभागाला आवश्यकता वाटत नाही. वार्ड क्रमांक 17 मध्ये कुठल्याही प्रकारची सूचना न देता माझ्या वॉर्डातील छाया गृहनिर्माण सोसायटी येथे स्वतःच्या खर्चातुन अंतर्गत वॉलचे बांधकाम केले होते. कोणतीही सूचना,नोटीस न देता अतिक्रमण विभागाकडून रात्री 8.30 वाजता भिंत पाडली जाते. एखादा निर्देश आला तर सभागृहापुढे ठेवावशी वाटत नसेल तर नागरीकांनी आम्हाला निवडूण दिलेले आहे, सर्व मिळून त्या अधिकारावर अतिक्रमण करता आहे असे माझे मत आहे. सोसायटीचा कोणताही उल्लेख नसतांना अतिक्रमणाबाबत कुठलीही तक्रार नसतांना, वाहतुकीस कुठलाही प्रकारचा त्रास नसतांना सोसायटीने सर्व करांची भरणा केलेली असतांना नागरीकांना, नगरसेवकांना पुर्वसूचना न देता रात्री भिंत पाडण्यात येते. आम्हाला तर नाही, पण शहराचे प्रथम नागरीक मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती यांनाही कल्पना नाही. छाया नगरी गृहनिर्माण संस्थेचे अतिक्रमण आहे असा उल्लेख आहे का? खुलासा करण्यात यावा. महानगरपालिकेचे कोणतेही देणे नसतांना भिंत पाडली. ती बांधून देण्यांत यावी. एवढे तातडीचे कर्तव्यदक्ष काम होते का रात्री 8.30 वाजता जाऊन उद्या दसऱ्याचा दिवस कोणासही कल्पना न देता दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. प्रशासकीय अधिकारी यांनी भिंत पाडली. छाया नगरी गृहनिर्माण संस्थेचे अतिक्रमण आहे असा उल्लेख होते का, आदेश होता का? सांगण्यात यावे. शहरातील अतिक्रमण संपलेले आहे का

म्हणून ही कार्यवाही केली.

प्रशासकीय अधिकारी : विधानसभा तारांकित प्रश्नाचे उत्तर पाठविले होते की, 18 ते 19 सोसायटी यांनी रस्ते बंद केलेले आहे. त्यावर काय कार्यवाही झाली. त्या संदर्भात सांगण्यात आले की, लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर फॅक्स आला की लगेच कार्यवाही करा. सिडको हडकोमधील यादी तयार करण्यात आली त्यांनी महानगरपालिकेची परवानगी घ्यायला हवी होती ती त्यांनी घेतली नाही. रस्ते बंद केले होते ते खुले करण्यात आले.

श्री.महेश माळवतकर :मनाने कारभार करण्याचे राज्य देण्यात आलेले आहे का? त्या दिवशी सर्वसाधारण सभा चालू होती सभागृहाच्या निर्देशनास ही बाब का नाही आणली गेली.

प्रशासकीय अधिकारी :संध्याकाळी 06.30 वाजता फॅक्स आला होता.

मा.सभापती :यादीमध्ये कॉलनीच्या नावाचा उल्लेख आहे का.

प्रशासकीय अधिकारी :यादीमध्य कॉलनीचा उल्लेख आहे.

मा.सभापती :यानंतर अशा प्रकारची कार्यवाही करण्यापुर्वी किमान 05 पदाधिकारी आणि संबधीत वार्डाच्या नगरसेवकांना माहिती देण्यात यावी. कल्पना देण्यात यावी. दुसऱ्या दिवशी दसरा होता.

श्रीमती साधना सुरडकर : प्रशासकीय विभाग अत्यंत कार्यक्षम दिसतो. संध्याकाळी जाऊन भिंत पाडली. अभिनंदन करायला हरकत नाही. मुख्यरोडच्या ठिकाणी शहानुरमियाँ दर्गा पीरबाजारच्या कॉम्पलेक्सच्या बाजुला टपरी ठेवण्यात आलेली आहे. प्रशासकीय अधिकारी यांना अनेक वेळा फोन केला परंतु अद्यापपर्यंत टपरी हटविण्यात आलेली नाही. जवळच महानगरपालिकेची पाटी लागलेली आहे.

मा.सभापती :मनपाच्या जागेवरील टपरी तात्काळ काढुन जप्त करण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी :स.सदस्यांचा तसेच इतर सदस्यांचा या संदर्भात फोन आल्यानंतर इमारत निरीक्षकास रात्री त्या ठिकाणी पाठविण्यांत आले. कागदपत्रे तपासली. संबधीताच्या म्हणण्यानुसार मी माझ्या जागेत टपरी टाकण्यांत आलेली आहे. मनपाच्या जागेवर नाही. याबाबतीत सर्व कागदपत्र घेऊन फाईल टाऊन प्लॅनिंगला तपासणीकरीता संचिका पाठविलेली आहे. त्यांनी क्लीअर केले तरख आपल्या जागेवर आहे, म्हणून आपण काढून घेवू.

मा.सभापती :मनपाच्या जगेवर टपरी ठेवण्यात आलेली आहे टपरी ताबडतोब जप्त करण्यात यावी. आपल्या नांवाचा बोर्ड लागलेला आहे.

मा.आयुक्त :टपरी ताबडतोब उचलण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :जालना रोडवर स्टील स्ट्रक्चरचे मोठे काम सुरू आहे याबाबत प्रशासनास वारंवार तक्रार केली होती मागील बैठकीत सूचना देण्यात आली होती. अतिक्रमण विभाग वरून फॅक्स आल्यावर रात्री बे रात्री काम करतात परंतु सदरील कामास फॅक्स आलेला नव्हता त्यामुळे ते काम सुरू आहे का खुलासा करण्यात यावा. फॅक्सद्वारे काम होत असेलतर निश्चितच वरून फॅक्स पाठविण्याची सोय केली जाईल. फॅक्सच्या माध्यमातुन स.सदस्य श्री.महेश माळवतकर यांच्या वार्डात रात्री बे रात्री काम केलेले आहे. फॅक्स

माध्यमातून काम केलेले आहे. फॅक्सद्वारे काम होत असेल, तर फॅक्स पाठवण्याची व्यवस्था करतो. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे त्यास कोण जबाबदार आहे.

मा.सभापती :तात्काळ कर्मचारी पाठवुन काम बंद करण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :दिड महिण्यापुर्वी सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता आज काम अंतिम टप्प्यात आहे. स्टीलचे फक्त स्ट्रेच उभे होते आज कारचे मोठे शोरूम त्या ठिकाणी उभे आहे तयार आहे

मा.सभापती :कॅवेट दाखल केलेले असल्यास ताबडतोब काम बंद करण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :नोटीस दिलेली आहे. कोर्टात यावे आणि स्टे घेऊन आपले काम निवांत चालू द्यावे. त्यावर कॅवेट दाखल करणे हा उपाय झाला आहे का.

मा.सभापती :काम ताबडतोब तोडण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :परवानगी दाखल केलेली आहे ती फेटाळलेली आहे. तोडुन टाकण्यात यावे. एखाद्या गरीब व्यक्ती 20 बाय 30 चे बांधकाम करत असेल तर मनपाची फौजफाटा जाऊन लोखंड स्टील बांधकाम साहित्य उचलुन आणले जाते. पैसे घेवून येतात. 100 फुटाच्या मोठया जालना रोडवर काम चालु त्या संदर्भात काय केले खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी खुलासा करण्यात यावा. दिड महिण्यापासून प्रश्न उपस्थित केला होता उद्याप पर्यंत कुठलिही कार्यवाही झालेली नाही.

श्री.मधुकर सावंत :चिरीमीरी घेतली असेल ते सभागृहात सांगण्यात यावे. मा.सभापती महोदय मा.आयुक्तांनी काय सांगीतले ते कळलेले नाही.

मा.आयुक्त :बैठक झाल्यानंतर प्रशासकीय अधिकारी यांनी सदरील बांधकाम तातडीने तोडण्याचे सांगण्यात आले. नोटीस दिलेली आहे सात दिवसांचा कालावधी संपलेला आहे. दुपारी जाऊन कार्यवाही करण्यात यावी.

श्री.नासेर खान :मा.आयुक्तांनी बांधकाम तोडण्याचे आदेश दिले यापुर्वी बैठकीत 50 आदेश दिले परंतु त्याची आजपर्यंत अंमलबजावणी झाली का? स्थायी समितीच्या एकाही आदेशाची अंमलबजावणी होत नाही. यापुर्वी मा.सभापती यांनी काही आदेश दिले होते त्या बाबतीत कुठलाच निर्णय झाला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :एक बैठक घेऊन अधिकाऱ्यांना सूचना देऊन फॉलोअप घेण्यात यावे.

श्री.नासेर खान :स्थायी समितीचे अधिकार काय आहेत यचा खुलासा करण्यात यावा. सर्वसाधारण सभेत 5 (2)2 वर चर्चा चालू असतांना मा.महापौरांनी स्थायी समितीच्या अधिकारातील नाही म्हणुन सांगीतले. स्थायी समितीचे अधिकार कोणते आहेत याचा खुलासा करण्यात यावा. या सभागृहात आमचे ऐकले जात नाही. आमचे काही अधिकार नसतील तर सभागृहात उपस्थित राहुन करायचे काय?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.सभापती यांचे काय अधिकार आहेत हे सभागृहाला सांगण्यात यावे.

श्री.नासेर खान :अधिकार नसतील तर सभागृहात कशासाठी बोलावले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :माझ्या माहितीप्रमाणे मा.महापौरांपेक्षा जास्त अधिकार आहे. मा.सभापती यांना.

श्री.नासेर खान :मी कुणावर टिप्पणी करत नाही. मा.महापौरांनी मागील बैठकीत बोलले आहे त्याचा खुलासा करण्यात यावा. गेल्या 4 महिण्यापासून मा.आयुक्तांकडे सिल्लेखाना येथील संचिका प्रलंबित आहे. प्रत्येक बैठकीत मुद्दा उपस्थित केला जातो परंतु निर्णय होत नाही.

श्री.विकास जैन :आठवडयाला एक मिटींग प्रस्ताव नसला तरी चर्चेसाठी लावण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :50 दिवस झाले, मिटींग लागून.

श्री.नासेर खान :सर्वसाधारण सभा , स्थायी समिती सभा यांची परवानगी न घेता शहरात किती अशी कामे झालेली आहेत. लाखो रूपयांची कामे झालेली आहेत. खुलासा करण्यात यावा जर खुलासा नसेल होत तर मी माझ्या लेटरहेडवर माझा राजीनामा देतो.

मा.सभापती :स.सदस्य श्री.नासेर खान यांची सभागृहाच्या अधिकाराबाबत विचारणा केलेली आहे त्या अधिकाराची माहिती नगर सचिव देतील. येणाऱ्या चर्चेवर पुढील बैठकीत कार्यवाही झाली पाहिजे. आठवडयाच्या प्रत्येक मंगळवारी स्थायी समितीची बैठक आयोजित करण्यात यावी.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :वार्ड फ मधील इमारत निरीक्षक यांचे मोबाईल नंबर देण्यात यावे दर आठ दिवसाला त्यांचे बदल्या होतात.

मा.सभापती :सर्व नगरसेवकांजवळ वार्डातील इमारत निरीक्षक यांचे मोबाईल नंबर देण्यात यावे.

श्रीमती साधना सुरडकर :दर आठ दिवसाला त्यांचे बदल्या होतात.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :नेहमी बदल्या करण्यात येवु नये. इमारत निरीक्षकास अवैध बांधकामाबाबत नगरसेवक माहिती देतात इमारत निरीक्षकाचे काय काम आहे. अनाधिकृत बांधकामाविषयी माहिती नगरसवेकाने दिली म्हणून सांगण्यात येते.

मा.सभापती :याबाबत अनेक नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. वार्ड ब चे सभापती श्री.अनिल जैस्वाल यांची सुध्दा मा.आयुक्तांकडे तक्रार केलेली आहे. मनपाचे इमारत निरीक्षक जाऊन तिथे सांगीतले की, आम्हाला नगरसेवकांना भेटावे लागते. म्हणून ते काम बंद करावे लागते. नगरसेवकांची बदनामी जे अधिकारी करत असेलतर त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. अथवा त्या ठिकाणाहुन बदली करण्यात यावी. अधिकारी यांनी त्यांचे अधिकाराचा वापर करावा नगरसेवकांना बदनाम करू नये.

श्री.मधुकर सावंत :डि.पी.प्लॅन विषयी पाच ते सहा प्रश्न विचारायचे आहेत. याबाबतची माहिती येणाऱ्या बैठकीच्या एक दिवस अगोदर देण्यात यावी.

1. डेव्हलपमेन्ट प्लॅन आतापर्यंत किती वेळेस तयार झाला.
2. किती लोकांच्या जमिनी डेव्हलपमेंन्ट प्लॅनमध्ये विवीध रिझर्वरेशन व रोडमध्ये गेलेल्या आहे.
3. किती लोकांना डेव्हलममेंन्ट प्लॅनमधील रोडचा आणि रोडच्या रिर्झवेशनचा मोबदला वाटाघाटीने दिलेला आहे.
4. किती लोकांनी डेव्हलपमेंन्ट प्लॅन मधील जागेचा आपल्या विरोधात जाऊन उच्च न्यायालयातुन जाऊन पैसे भरण्यास

भाग पाडले आणि किती लोकांचे पैसे कोर्टात जमा केले.

5. नविन डेव्हलपमेंन्ट प्लॅन केव्हा तयार करणार आहे आणि त्या डेव्हलपमेंन्ट प्लॅनसाठी मनपाला किती खर्च येणार आहे.

याबाबतची सर्व माहिती येणाऱ्या बैठकीच्या एक दिवस अगोदर सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना देण्यात यावी.

मा.सभापती :सर्व सदस्यांना पुढील बैठकीच्या एक दिवस अगोदर माहिती देण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एखादा टेक्नीकल एक्स्पर्ट असेल, त्यांना बोलवावे. बांधकाम परवाना क्रमांक 177/2005-06 बाबत माझा प्रश्न आहे. श्री.डी.पी.कुलकर्णी यांना पत्र दिले असता सदरील बांधकाम परवाना महानगरपालिकेने दिलेले नाही. बांधकाम परवाना क्र.177/2005-06 वर श्री.देशमुख साहेबांची सही आहे. बांधकाम परवानावर सन 2006 ची तारीख आहे. श्री.देशमुख यांची सही सन 2004 ला केलेली आहे. संबधीताने पैशाची भरणा सन 2003 रोजी केलेली आहे. श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांकडे प्रत दिलेली आहे.

मा.सभापती : सहा.संचालक,न.र. यांनी खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांनी मला जे कागदपत्रे दिले, त्यात जे रजिस्टर आहे, रजिष्टरमध्ये शेख मुर्तूजा अहमद पिता शेख फरीद, भडकलगेट संचिका क्रमांक 172 बरोबर आहे का? बांधकाम परवाना क्रमांक 177/2005-06 दिनांक 20.07.2005, श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी दिलेले पत्र क्रमांक 1982 दिनांक 01.10.2010 त्यामध्ये मा.सहा.संचालक यांचे असे म्हणने आहे की, सबब वरील क्रमांकनुसार अभिलेखाची पडताळणी केली असता संचिका क्रमांक व परवाना क्रमांक एकमेकांशी सुसंगत नाही. तरी बांधकाम परवाना क्रमांक 177/2005-06 ची छायाप्रत व बांधकाम परवानगी संचिका क्रमांक 172/ 17/2006-07 च्या आवक जावक रजिष्टरची छायाप्रत बांधकाम परवानगी त्यांनी डिक्लेरेशन डिडला लावुन बोगस बांधकाम परवानगी कुणी दिली. इमारत निरीक्षक यांना निलंबीत केले होते. त्यांना पुन्हा विना चौकशी कामावर घेण्यात आले. चार वेळेस निलंबीत केले व पुन्हा त्याच विभागात कामावर घेतले त्यांनी ही बांधकाम परवानगी दिली असे संबधीताचे म्हणणे आहे. सहा.संचालकाच्या म्हणण्यानुसार बांधकाम परवानगी मनपाने दिलेली नाही. मी आपणांकडे मूळ कागदपत्रे दाखल केलेले आहे. डिक्लेरेशन डीडचे बघावे. संबधीताविरूध्द सर्वप्रथम गुन्हा दाखल करण्यात यावा. बोगस बांधकाम परवानगी दिलेली आहे. बांधकाम परवानगी सहा.संचालक यांनी इश्यू केलेली आहे का?

मा.सभापती :बांधकाम परवानगी इश्यु केलेली आहे का?

सहा.संचालक न.र :जी बांधकाम परवानगी लावण्यात आलेली आहे ती इश्यू केलेली नाही.

मा.सभापती :आपल्याकडे त्याचे पैसे भरलेले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पैसे भरणा केलेले नाही. दुसऱ्या नंबरची बांधकाम परवानगी आहे.

मा.सभापती :दुसरी कोणाची परवानगी आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पान क्रमांक 2 मध्ये लिहिलेली आहे. ओरिजनल कागद आहे सर्वप्रथम गुन्हा नोंदविण्यात यावा. श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांनी लेखी दिले आहे. डिड ऑफ डिक्लेरेशन आहे त्यामध्ये पान क्रमांक दोन वर अगोदर तीसऱ्या लाईनवर एरिया 450 स्के.फुट लिहिलेला आहे आणि खाली लिहिलेले आहे. एरिया 162.51 स्के.मिटर म्हणजे 1749 स्के.फुट. संबधीताविरूध्द गुन्हा दाखल करावा.

मा.सभापती :स.सदस्य श्री.साजेद भाई यांनी जो विषय मांडलेला आहे तो अतिशय गंभिर विषय आहे. मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, मुख्यलेखापरिक्षक श्री.जाधव यांचेकडे मनपाने जेवढया परवानगी दिलेल्या आहेत त्याची पूर्ण चौकशी करण्यांत यावी. कुणाकुणाला दिल्यात कुणाकुणाला बोगस दिल्या आहेत. जे कोणी संबंधीत अधिकारी असतील, त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यावेळेस बांधकाम परवानगी देतो त्यावेळेस मालकी हक्क आहे किंवा नाही हे तपासुन पहात नाही. रजिष्ट्रीच्या कॉपी एका बिल्डरने मायनर च्या नावाने रजिष्ट्री केलेली आहे. 11 वर्षाच्या मुलाने रजिष्ट्री करून दिलेली आहे. एवढीमोठी स्कीम मंजूरी दिली आहे.

मा.सभापती :ज्या चुकीच्या किंवा बोगस बांधकाम परवानगी असेल त्यासाठी मुख्यलेखापरिक्षक श्री.विलास जाधव यांनी चौकशी करावी. आणि ज्या ज्या परवानगी चूकीच्या, बोगस दिल्या असतील, संबधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :त्याच्यामध्ये सर्व गोष्टींचा उल्लेख करा. रजिष्ट्रीच्या डॉक्युमेंट पासून ते 5000 स्के.फुटच्या प्लॉटवर 3000 स्के.फुट टिडीआर देत आहे. म्हणजे सर्व अतिरेक सुरू आहे.

मा.सभापती :या विभागाची पुर्ण ती चौकशी करण्यात यावी. चौकशी करून अहवाल पुढील बैठकीत अथवा एक महिण्यानंतर सादर करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :गुन्हा केव्हा दाखल करणार.

श्री.रेणुकादास वैद्य :मुख्यलेखापरिक्षक यांना काही मदत लागल्यास ती आमच्याकडुन देण्यात येईल.

मा.सभापती :काही माहिती लागल्यास ती स.सदस्याकडून उपलब्ध करून घ्यावी. एक महिण्याच्या आत स्थायी समितीकडे अहवाल सादर करण्यात यावा. स.सदस्य श्री.साजेद यांनी सादर केलेले प्रकरणाची सर्वात प्रथम चौकशी करण्यात यावी. याचेवर जो कुणी दोषी असेल त्यावर फौजदारी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :हे सिध्द झाले आहे की, बांधकाम परवानगी आपण दिलेली नाही. ज्यांनी हे केलेले आहे त्यांचेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात यावा.

श्री.नासेर खान :शहरातील बिल्डर हे जेवढे मोठ मोठे बिल्डर, अर्किटेक ते चालवतात ऑफिसमध्ये बसुन परवानगी घेतली जाते.

श्री.रेणुकादास वैद्य :खुल्या जागेवर बिल्डरांना परवानगी दिली जाते.

मा.सभापती :या सर्वांची चौकशी करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :टाऊन प्लॅनिग विभागाचे स्वतंत्र ऑडिट करण्यात यावे.

श्री.नासेर खान :शहरातील बिल्डर मोठ मोठे अक्रिटेक ते चालवतात ऑफिसमध्ये बसुन परवानगी घेतली जाते.

मा.सभापती :टाऊन प्लॅनिग विभागाचे सर्व ऑडिट करण्यात यावे.

श्री.जगदिश सिध्द :सर्वात कमकुवत बाजू म्हणजे बांधकाम परवानगी घेतली जाते परंतु कम्पलिशन सर्टीफिकेट घेतले जात नाही. 99 टक्के आर्किटेकने कंम्पलिशन घेतले नाही म्हणून बिल्डरने घेतले नाही. आर्किटेकवर बंधन घालण्यात यावे.

मा.सभापती : बांधकाम परवानगी देतांना त्याच्याकडुन जी काही मर्यादा असेल सहा महिण्यांची ती कम्पलिशन घेतली पाहीजे. कम्प्लीशन घेतले की नाही ती तपासली का? नसेलतर ती परवानगी रद्द करण्यात यावी.

श्री.जगदिश सिध्द :परमिशन रद्द आहे तर दुसरी फाईल घेण्यात येवु नये.

मा.सभापती :ज्या आर्क्रिटेकच्या माध्यमातुन बिल्डरची बांधकाम परवानगी दिली असेल. पुर्वीच्या बिल्डींगची कम्पलिशन घेतलेली नसेलतर पुढील बिल्डींगची परमिशन देण्यात येऊ नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :गुन्हा केव्हा दाखल करणार.

श्री.जगदिश सिध्द :यामध्ये आर्किटेक स्वतः सहभागी असतो.

मा.सभापती :श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांनी स्वतः खुलासा केलेला आहे की, परमिशन टाऊन प्लॅनिंग विभागाकडुन दिलेली नाही. मा.आयुक्तांनी आता हया कर्मचाऱ्यावर कोणता गुन्हा दाखल करावा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :मुख्यलेखापरिक्षक मार्फत चौकशी लावण्यात आलेली आहे. ती तपशिलवारपणे होईल. एक ते दोन दिवसांमध्ये ADTP यांनी याबाबतीत अहवाल देण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सहा.संचालक न.र. यांचे पत्र दिलेले आहे. गुन्हा दाखल करा.

मा.आयुक्त : आपणांस जसे दिले, तसा अहवाल मला देण्यांत यावा, त्यांचे पत्र आहे. याच्या अनुषंगाने त्याचा रिपोर्ट घेऊन गुन्हा दाखल करतो.

श्री.जगदिश सिध्द :इमारत निरीक्षक यांचेवर सर्वप्रथम निलंबनाची कारवाई करावी नंतरची चौकशी करण्यात यावी.

मा.आयुक्त :जो कुणी यामध्ये जबाबदार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :निलंबन करून पुन्हा कामावर घेण्यात आहे.

श्री.जगदिश सिध्द :निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :एक अधिकारी 24 वेळेस निलंबीत होऊ शकतो.

मा.आयुक्त :कागदपत्र घेऊन लवकरच क्रिमनल केस दाखल करण्यात येईल.

श्री.विजय वाघचौरे :गुंठेवारी विभागाचे या वर्षी प्रभाग-ई मधुन एक कोटी रूपये वसुलीचे उद्दीष्टे ठेवलेले आहे. प्रभाग ई मध्ये 10 ते 12 वार्ड हे गुंठेवारीमध्ये आहे. काही दिवसापुर्वी मा.महापौरांनी रूलिंग दिलेले आहे की, या ठिकाणी गुंठेवारी डबल होईल. प्रश्युमन शुल्क डबल होईल त्यासाठी सर्व नागरीकांनी पैसे भरून मदत करावी, घरे नियमीत करुन घ्यावी. संबधीत प्रभागात त्यासाठी एक कर्मचारी आहे. शेकडो नागरीक त्या ठिकाणी येतात

व त्यांच्या संचिकेबाबत अंतिम मंजूरी, चलनबाबत विचारणा करतात. त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे. कर्मचारी संख्या वाढविण्यात यावे. जेणेकरून नागरीकांना त्रास होणार नाही व नियमीत भरणा महापालिकेत होईल याचा फायदा मनपास होईल तसेच नागरीकांच्या वार्डातील विकास कामे होतील.

श्री.अमित भुईगळ :AMT आणि मनपा यांचा करार झालेला आहे. किती बसेसला टर्बो इंजिन आहेत. करारानुसार सर्व बसेसला टर्बो इंजिन असले पाहिजे. पावरडोअर सुध्दा ॲग्रीमेंटमध्ये झाले होते. AMT च्या कुठल्याही बसेसला टर्बो इंजिन नाही. या संदर्भात संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. शालेय विद्यार्थ्यांसाठी पास देण्यात आले होते. महानगरपालिकेत किती रॉयल्टी जमा झालेली आहे.

मा.सभापती :10 मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.

(सभा तहकूब दु.2.30 वा. 2.40 वा.पुन्हा सभेचे कामकाज पुन्हा सुरू)

श्री.अमित भुईगळ :या ठिकाणी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विजय वाघचौरे :AMT च्या वाहनांची चोरी होत आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :बसेसचे पार्ट चोरी होत आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. लिलाव केल्यास काही रक्कम प्राप्त होईल चोरी गेल्यास काहीच प्राप्त होणार नाही.

श्री.जगदिश सिध्द :सुरक्षा रक्षक असुन त्या ठिकाणाहुन बसेसचे पार्ट चोरीला जात आहे काय कार्यवाही करणार आहे. वर्तमानपत्रामध्ये फोटो आलेले आहे बसेसला चाक नाही.

उपअभियंता (यांत्रिकी) :73 बसेसपैकी 72 बसेस एन-12 येथे ठेवलेल्या आहेत. 01 बस वर्कशॉपमध्ये ठेवलेली आहे. 72 बसेससाठी 8 सुरक्षारक्षक ठेवलेले आहे. 24 तास त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक कार्यरत असतात.

श्री.विकास जैन :सामना वर्तमानपत्रामध्ये फोटो छापुन आलेला आहे. त्या गाडीला चाकच नाही.

उपअभियंता (यांत्रिकी) : ती अगोदरचीच पोजीशन आहे. त्याच्या डिस्क आहेत. ते बाहेरून आल्या होत्या. टायर रिपेअर करण्यासाठी पाठविले होते.

श्री.जगदिश सिध्द :चोरी झालेली आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य :72 गाडयाचे पार्ट चोरीला जाणार नाही त्याची पुर्ण सुरक्षेची काळजी घेण्यात आली आहे का?

उपअभियंता (यांत्रिकी) :होय.

श्री.जगदिश सिध्द :जबाबदारीने सांगण्यात यावे बातमी सत्य असल्यास आपल्यावर कार्यवाही होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :पेपरला आलेली बातमी चुकीची आहे असे म्हणणे आहे का?

उपअभियंता (यांत्रिकी) :वर्तमानपत्रात आलेली बातमी वाचलेली नाही.

श्री.जगदिश सिध्द :जबाबदारी घेता का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सभागृहासमोर संबधीत अधिकारी यांनी जबाबदारी घेण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ :गाडयांना टर्बो इंजिन आहेत का?

उपअभियंता (यांत्रिकी) :सर्व गाडयांना टर्बो इंजिन आहेत.

श्री.अमित भुईगळ :पॉवर डोअर कुठे आहेत.

उपअभियंता (यांत्रिकी) :काही गाडयांनाच होते.

श्री.अमित भुईगळ :करारनाम्यामध्ये नव्हते का .

उपअभियंता (यांत्रिकी) :सुरवातीला बसविले नंतर बसविले नाही.

श्री.अमित भुईगळ :का नाही बसविण्यात आले. आपल्या खर्चातुन त्या गाडयांना टायर दिलेले आहे. विद्यार्थ्यांचे पासेसचे पैसे जमा झालले आहेत का.

श्री.रेणुकादास वैद्य :ताबडतोब बसेसची विल्हेवाट लावुन मनपाच्या आर्थिक उत्पन्नात कशी भर पडेल ते पहाण्यात यावे.

उपअभियंता (यांत्रिकी) :पासेसचे पैसे मनपाने दिलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :किती दिले आहे.

उपअभियंता (यांत्रिकी) :39 लाख रूपये.

श्री.अमित भुईगळ :गाडयांचे पार्ट चोरीला जात आहे. माझ्या वार्डात बसेस ठेवण्यात आलेल्या आहेत. सुरक्षेच्या कुठल्याही यंत्रणा व्यवस्थीत नसल्यामुळे गाडयांचे पार्ट चोरीला जातील. ज्या 72 गाडया ठेवण्यात आलेल्या आहेत मनपाच्या जागेवर त्या गाडयांची तात्काळ निवीदा काढण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :AMT बाबत मा.सर्वसाधारण सभेमध्ये सांगोपांग चर्चा झालेली आहे. स.सदस्यांच्या भावना रास्त आहेत. महानगरपालिकेने त्यास गॅरंटी दिली हि चुक झाली. बसेसच्या सुरक्षेसाठी आठ कर्मचारी नेमण्यात आलेले आहे. त्यावर हजारो रूपये खर्च करण्यात येत आहे. AMT मुळे मनपा तोटयात आलेली आहे. रॉयल्टी मनपास मिळालेली नाही. लवकरात लवकर बसेसची विक्री करण्यात येवुन बँकेकडे रक्कम भरणा करा जेणे करून आपली Liability कमी होईल.

श्री.अमित भुईगळ :जे आठ सुरक्षा रक्षक ठेवण्यात आले आहे ते कुठल्या सेक्युरिटीचे आहेत.

उपअभियंता (यांत्रिकी) :सुरक्षा अधिकारी यांनी आठ सेक्युरिटी पाठविण्यात आलेले आहे.

श्री.अमित भुईगळ :पुण्याचे सेक्युरिटींना कुणी लावले आहे. 16000/- रूपये पगार सुरक्षा रक्षकांना दिला जात आहे. स्थायी समितीची कुठलिही मान्यता न घेता सुरक्षा रक्षक परस्पर लावण्यात आलेले आहे. खाजगी पुण्याच्या सेक्युरिटीला स्थायी समितीने मान्यता दिली आहे का? असे कितीतरी प्रश्न आहेत की, जे बाहेरच्या बाहेर मार्गी लावले जातात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मान्यता झालीच पाहिजे.

श्री..आगा खान :मान्यता का नाही झाली.

श्री.अमित भुईगळ : खाजगी पुण्याच्या सेक्युरिटीला घेतांना स्थायी समितीने मान्यता घेणे आवश्यक होते. ती का नाही घेतली .

मा.सभापती :संबधीत अधिकारी सुरक्षा रक्षक बाबत खुलासा करतील.

प्रशासकीय अधिकारी :अतिक्रमण विभागाला जे सेक्युरिटी दिले होते जे की, मॉस्को एजन्सीचे सेवानिवृत्त आहे यास पुर्ण मान्यता दिल्यानंतर 15 सुरक्षा रक्षक आपल्याकडे आले होते. त्यापैकी आठ सुरक्षा रक्षक त्या ठिकाणी सेक्युरिटीसाठी देण्यात आले.

श्री.अमित भुईगळ :15 लोकांची मान्यता स्थायी समितीमध्ये का घेण्यात आली नाही.

प्रशासकीय अधिकारी : मान्यता घेतली की नाही याबाबतीत अस्थापना विभाग बघतो.

श्री.अमित भुईगळ :अस्थापना विभागाचे संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

अस्थापना अधिकारी-1 :सेक्युरिटी संदर्भातील संचिका कामगार विभागामार्फत चालविण्यात येते.

श्री.अमित भुईगळ :ज्या अधिकाऱ्यांनी सेक्युरिटी लावण्यासंदर्भात चिरीमिरी घेतली असेल त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :एवढया मोठया प्रमाणावर जर भरती करत असेल व सभागृहाची मान्यता घेण्यात येत नसेल तर ही गंभीर बाब आहे. ज्या कोणी मान्यता दिली असेल त्यांचेवर कार्यवाही करावी लागेल. संचिका त्वरीत मागवुन घेण्यात यावी. मान्यता घेतली नसल्यास त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.पूढच्या सभेत काय कार्यवाही झाली ते सांगा. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती वाईट असतांना आठ सुरक्षा रक्षकांवर 16000/- रूपये खर्च करीत आहे. तरी बसेसचा त्वरीत लिलाव करण्यात यावा लिलावाची किंमत आयसीआयसीआयच्या बँकेने ॲथोराईज्ड् व्हॅल्युअरने आधारभुत किंमत काढून दिलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ताबडतोब टेंडर काढण्याचे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती :ताबडतोब टेंडर काढुन लिलाव करण्यात यावा. AMT च्या बसेस सिक्युरिटी लावुन संभाळत असेल त्यामुळे बसेसची डीपरेशन व्हॅल्यु कमी होत असेल, चोरीच्या घटना घटत असेलतर मनपाच्या हाती काहीही लागणार नाही. सुरक्षा रक्षकांचे पगार केले जात आहे. प्रशासनास आदेशीत करण्यात येते की, बसेसच्या विक्री संदर्भात टेंडर तात्काळ काढण्यात यावे. तसेच जे सुरक्षा रक्षक स्थायी समितीच्या मंजुरीविना घेण्यात आलेले आहे. ते कुठल्या आधारे घेतलेले आहे याचा खुलासा होणे जरूरी आहे आणि ज्या अधिकाऱ्यांने हिम्मत केली असेल विना स्थायी समितीची मंजूरीची ते पैसे त्यांच्या पगारातुन कट करण्यांत येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अहवाल सादर करण्यात यावां.

मा.सभापती :पुढील बैठकीत कुठली कार्यवाही केली याबाबतीतचा अहवाल सादर करावा. पुढील बैठकीपुर्वी AMT च्या निवीदा काढण्यात याव्यात. मनपाच्या जुन्या गाडया धुळखात उभ्या अवस्थेत आहे. बरेचसे पार्ट चोरी जात आहे. त्याचे व्हॅल्युअर कडून व्हॅल्युएशन काढुन निवीदा काढण्यात याव्यात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :निवीदा काढुन पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

मा.सभापती :पुढील बैठकीत सविस्तर ठेवण्यात यावे. मनपाचे जकातीचे 138 कोटी रूपयांची निवीदा काढलेली आहे. महिण्याला पेमेंन्ट घेण्यात येते. त्यात वर्ग चारचे पेमेंन्ट करण्यात यावे. वर्ग 1 ते वर्ग 3 अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पेमेंन्ट कर वसुली पाणीपट्टी वसुलीतून करण्यात यावे. असे आदेशीत करण्यात येते. जकातीद्वारे जी रक्कम येते त्याद्वारे पमेंन्ट होते त्यामुळे वसुलीकडे कुणी लक्ष देत नाही. जकातीचे रकमेतुन लाईटबील, अत्यावश्यक कामासाठी आणि विकासकामासाठी खर्च करण्यात यावे. प्रशासन कर वसुलीमध्ये शुन्य आहे. 7 टक्के 8 टक्के अशी कर वसुली आहे. श्री.जावळीकर कर वसुलीसंदर्भात कामाला लागलेले आहे गेल्या आठ दिवसांत चांगले काम केलेले आहे. यास

अजुन गती देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.विजय वाघचौरे :मनपाच्या शहरातील दुकानांचे टेंडर काढण्यात आले होते. किती दुकानांना नोटीस देऊन भाडे भरून घेण्यात आले व किती दुकाना भाडे तत्वावर दिलेले आहे. स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे . खुलासा करण्यात यावा. आर्थीक परिस्थीती खराब असल्याने एक वर्षाचे आगाऊ डिपॉसिट भरून घेतो.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यांना आपण रिझंवेशन अकॉमोडेशनमध्ये परमिशन दिल्या आहेत. मनपाला जागा देणे लागते, हॅन्डओव्हर करावे लागते त्या जागा पुर्ण भरून घेतल्या आहेत का? त्याचे निवीदा काढल्या आहेत का?

मा.सभापती :मागील बैठकीत रूलिंग देण्यात आलेली आहे. जे अॅग्रीमेंट 30 वर्ष 99 वर्षाचे झालेले असतील ते फक्त 3 वर्षासाठी करण्यात याव्यात. त्यांना बोलावुन अॅग्रीमेंट चेंज करण्यात यावे.

मालमत्ता अधिकारी :पहिला प्रश्न होता की, किती दुकाने रिक्त आहेत ती कुणाला दिली आहे किंवा नाही. त्या बाबत खुलासा करण्यात येतो की, मनपाचे 26 गाळे आहे त्यात जवळपास 630 दुकाना आहेत. त्यापैकी 52 दुकाना आजमितीस रिक्त आहेत. या सर्वासाठी टेंडरची प्रक्रीया प्रस्तावित केलेली आहे. आठव्या महिण्यात स्थायी समितीची मान्यता मिळालेली आहे फक्त कारणा पुरता उतारा न मिळाल्यामुळे पुढील प्रोसेस करू शकलेलो नाही. याबाबतीत मा.सचिव यांचेकडे मागणी केलेली आहे.

मा.सभापती :कारणापुरता उतारा हा छोटा विषय आहे.

मालमत्ता अधिकारी :पेपरवर्क करण्यासाठी आवश्यक आहे त्यामुळे पुढील प्रोसेस करू शकत नाही. पर्सनली विभागातील हेडक्लर्क यांना मा.सचिव यांचेकडे पाठविण्यात आले होते. कारणापुरता उतारा प्राप्त झाला नाही. प्राप्त होताच पुढील प्रक्रीया सुरू करण्यात येईल. सर्व संचिकांवर लवकरात लवकर कार्यवाही सुरू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्या बिल्डर्सला परवानगी दिली आहे रिझंवेशन अॅकोमेडेशनमध्ये त्या काही जागा मनपाच्या देणे लागतात. त्या हॅन्ड ओव्हर करून घेतले आहेत का खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :अशे जवळपास 350 प्रकरणे आहेत. मनपाने मनपाच्या नावांवर करण्यासाठी संचिका मुव्ह केलेल्या आहेत. ADTP विभागात दिलेल्या आहेत. यापैकी 80 च्या जवळपास मनपाच्या नावांवर झालेल्या आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :बांधकाम परवानगी 8 ते 10 वर्षापुर्वी दिलेल्या आहेत. बिल्डर्सने सर्व पैसे खिशात घातले आहेत. अजुनही मनपास प्रॉपर्टी आलेल्या नाहीत. अशा किती प्रॉपर्टी आहेत खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :ADTP साहेब याबाबतीत खुलासा करू शकतील. Because this question belongs to this department.

श्री.रेणुकादास वैद्य :It is related to you also.

ADTP :अॅकोमेडेशन रिझंवेशन च्या माध्यमातुन बांधाकाम परवानगी गेल्या 10 वर्षात दिलेल्या आहेत. त्याबाबतची यादि आता उपलब्ध नाही पुढील बैठकीत माहिती सादर करण्यात येईल.

मा.सभापती :येणाऱ्या बैठकीत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**विषय क्र. 53 :**

दिनांक 26/07/2010 व 29/07/2010 (का.प.क्र.5) रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

दिनांक 26/07/2010 व 29/07/2010 (का.प.क्र.5) रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 54 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड इ व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्रं.93 अंतर्गत व्यंकटेश कॉलनी, रचनाकार कॉलनी अंतर्गत भागात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008 ते 2009 च्या दर सुची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.1988000/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.1988000/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रं.93 अंतर्गत व्यंकटेश कॉलनी, रचनाकार कॉलनी अंतर्गत भागात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाच्या रक्कम रू.1988000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 55 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड इ व फ महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्रं.93 अंतर्गत एम.आय.डी.सी. कॉलनी अंतर्गत रस्त्याची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008 ते 2009 च्या दर सुची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.1697229/-इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.1697229/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रं.93 अंतर्गत एम.आय.डी.सी. कॉलनी अंतर्गत रस्त्याची दुरूस्ती करणे या कामाच्या रक्कम रू.1697229/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 56 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, न्यु नंदनवन कॉलनी (भुजबळ नगर) येथे नविन 150 मि.मी. व्यासाची डीआयके-9 व 100 मि.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहीनी टाकणे. या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये

10,27,475/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची दि.07/10/2010 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च हा गुंठेवारी विकास कामे या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रूपये 10,27,475/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न्यु नंदनवन कॉलनी (भुजबळ नगर) येथे नविन 150 मि.मी. व्यासाची डीआयके-9 व 100 मि.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहीनी टाकणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 10,27,475/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 57 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.92 कबीरनगर मिलींदनगर येथील चॅनल गटार दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन 2008-2009 च्या दर सुची प्रमाणे तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.1994778/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.1994778/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.92 कबीरनगर मिलींदनगर येथील चॅनल गटार दुरूस्ती करणे या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.1994778/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 58 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.92 अंतर्गत रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दर सुची प्रमाणे तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.1980000/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.1980000/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.92 अंतर्गत रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणे या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.1980000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 59 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्रं.64 क्रांतीचौक येथे श्री.चौधरी यांचे घर बापटवाडी ते उत्सव मंगल कार्यालय चौकापर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक

बांधकाम खात्याचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,99,200/- होत आहे. सदरील काम सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात नविन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त करून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू.14,99,200/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रं.64 क्रांतीचौक येथे श्री.चौधरी यांचे घर बापटवाडी ते उत्सव मंगल कार्यालय चौकापर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे तयार करण्यांत आलेले र.रू.14,99,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60 :**

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेने उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या जाफरगेट येथील आठवडी बाजार(रविवार)शुल्क वसुलीसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा अनुक्रमे श्री.प्रितमकुमार गणेश हटवाल आणि श्री.दिनेश दादाराव आठवले अशा दोनच निविदा प्राप्त झाल्या असता लिफाफा क्र.01 (तांत्रीक लिफाफा) उघडण्यात आला असता अटी शर्तीची पुर्तता न झाल्याने लिफाफा क्र.02 (निविदा दर) उघडण्यात आलेले नव्हते.

त्यानंतर सन 2006-2007 ते 2009-2010 पर्यंतच्या मागील ठेक्याच्या दरा संदर्भाने (रविवार आठवडी बाजार) तुलनात्मक तक्ता तयार करून सन 2010-2011 साठी प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता श्री.प्रितमकुमार गणेश हटवाल यांची निविदा दर रू.19,500/- जो आधारभूत दरापेक्षा कमी असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलावून जो पूर्वीचा जास्तीत जास्त दर रू.21,000/- प्रति बाजार असा होता त्यापेक्षा जास्तीचा दर प्रतिबाजार रू.23,000/- मध्ये आठवडी बाजार शुल्क वसुलीचा ठेका घेण्यास संबंधीताने लेखी संमती दिली आहे. त्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची दिनांक 24/08/2010 रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

जर महानगरपालिकेने त्वरीत कार्यवाही सुरू केली तर येणारा बाजाराची वसुली ठेकेदार सुरू करू शकेल व पर्यायाने महानगरपालिकेचा रू.4,000/- इतका फायदा होऊ शकतो. तसेच सन 2010-2011 साठी दि.31 मार्च 2011 पर्यंत फक्त 6 ते 7 महिन्यासाठीच असल्याने ठेक्यात नमुद अटी शर्तीनुसार संबंधीतास एकुण बाजाराच्या 25 टक्के अनामत रक्कम आणि एकुण पाच बाजाराचे आगाऊ ठेका रक्कम भरून घेण्यासंदर्भाने कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली असून सदरील प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित करण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 61 :**

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेने उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको नाट्यगृह येथील वाहनतळ शुल्क वसूली संदर्भाने स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता प्रकरणात एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असता

सदर निविदा मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने दि.21/09/2010 रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | अपेक्षित दर | नमुद केलेले दर |
|---|---|---|---|
| 01. | श्री.अमोल चंद्रकांत निकम | रू.8000/- प्र.म. | रू.11,501/- प्र.म. |
| 02. | श्री.नासेर खान उस्मान खान | रू.8000/- प्र.म. | रू.4555/- प्र.म. |

यांप्रमाणे एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असून अपेक्षित रक्कमेपेक्षा जास्त दराची निविदा श्री.अमोल चंद्रकांत निकम यांची रक्कम रू.11,501/- प्रती महा नुसार असल्याने सदर ठिकाणचे वाहनतळ शुल्क वसुलीचा ठेका संबंधीताच्या नावाने मंजुर करणे योग्य राहील.

करिता, प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको नाट्यगृह येथील वाहनतळ शुल्क वसूली करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी अपेक्षित रक्कमेपेक्षा जास्त दराची व तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराची रक्कम रू.11,501/- प्रती महा या दराच्या श्री.अमोल चंद्रकांत निकम यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 62 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत राज्याच्या नागरी भागातील आर्थिक दुर्बल घटका करीता वैयक्तीक शौचालय बांधकाम कार्यक्रम राबविण्याकरीता प्रत्येक शहरातली आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तीचा सर्वे करून लाभार्थींची संख्या निश्चीत करणे, लाभार्थ्यांना बायोमेट्रीक पध्दतीची ओळखपत्रे देणे, जनजागृती करण्यासाठी चर्चासत्रे, प्रशिक्षण आयोजीत करणे, लाभार्थ्यांना करावयाच्या खर्चाची रक्कम गोळा करून ती नागरी संस्थेकडे जमा करणे या करीता शासनातर्फे नागरी संस्था करीता स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थांची (NGO) यांची निवड करण्यात येईल अशा NGO ना त्यांच्या कामाचा मोबदला एकूण प्रकल्प खर्चाच्या व्यतिरिक्त 15% मर्यादेपर्यंत उपलब्ध करण्यात येणाऱ्या निधी मधून देण्यांत येईल.

सदरील खर्च हा केंद्र व राज्य शासनामार्फत अंमलबजावणी विविध टप्प्यावर 5:1 या प्रमाणात उपलब्ध करून देण्यांत येईल.

केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत मनपा हद्दीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींचे (मासिक उत्पन्न रू.3300/-) प्रती कुटूंब सर्वेक्षण करून वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रस्ताव तयार करणे (DPR) इत्यादी कामाकरीता NGO नियुक्त करण्यासाठी दि.5/06/2010 रोजीच्या वर्तमानपत्रातून निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येऊन दरपत्रके मागविण्यात आली असता एकूण 6 दरपत्रके भरून प्राप्त झाली आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 01. | युवा सुशिक्षित बेरोजगार संस्था | एकूण प्रकल्प किमंतीच्या 7 % दराने |
| 02. | श्री.शिवछत्रपती मराठा प्रतिष्ठाण चंद्रपुर | एकूण प्रकल्प किमंतीच्या 10 % दराने |
| 03. | अ.सलाम पठाण ग्रामीण विकास संस्था गाढे जळगांव, औरंगाबाद | एकूण प्रकल्प किमंतीच्या 10.50 % दराने |
| 04. | आदर्श ग्राम विकास संस्था अमरावती | एकूण प्रकल्प किमंतीच्या 14 % दराने |

05. यशवंतराव स्मृती सामाजिक शैक्षणिक संस्था कामाचा अनुभव नसल्याने अपात्र

06. राहुल फाऊंडेशन ऑडीट रिपोर्ट न लावल्याने अपात्र

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच एकूण प्रकल्प किमंतीच्या 7 % दराचे दरपत्रक युवा सुशिक्षित बेरोजगार संस्था यांचे प्राप्त झालेले असून दराबाबतच्या वाटाघाटी अंती एकूण प्रकल्प किमतीच्या 7 % दरा ऐवजी 6 % दराने मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबतची शिफारस मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक 02/09/2010 रोजी केलेली आहे.

त्यानुसार युवा सुशिक्षित बेरोजगार संस्था यांचे दर म्हणजेच एकूण प्रकल्प किमतीच्या 7 % दरा ऐवजी 6 % दराने मंजुरी बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत मनपा हद्दीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटूंब सर्वेक्षण करून वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रस्ताव तयार करणे (DPR) इ. कामाकरीता NGO म्हणुन नियुक्त करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच एकूण प्रकल्प किमंतीच्या 7% कमी दराचे निविदाधारक युवा सुशिक्षित बेरोजगार संस्था यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार एकूण प्रकल्प किमतीच्या 7% दरा ऐवजी 6% दराने सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 63 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.हरिभाऊ गणपत गायकवाड, मलेरिया मजूर, आरोग्य विभाग यांना हृदयरोग उपचारासाठी एकूण खर्च रूपये 294051=00 इतका आला आहे. सदर खर्चाच्या 5% रक्कम संबंधीताने रूपये 14703=00 शासन निर्णय क्र.ए.एम.जी.2005/9/प्र.क्र.1/आरोग्य-3 दि.19/03/2005 तसेच स्थायी समितीमध्ये दि.05/02/2008 रोजी पारित झालेला ठराव क्रमांक 365 नुसार मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे.

त्यांनी उपचारासाठी खर्च केलेल्या एकूण रक्कम रूपये 294051=00 पैकी अनुज्ञेय खर्च रूपये 264930=00 इतका आहे. त्याच्या 90% रूपये 238437=00 इतका नियमानुसार देय आहे. देयक रक्कमेतून 5% रक्कम 14703=00 वजा करणे आवश्यक आहे. संबंधीताला कार्यालयातर्फे रूपये 40000=00 अग्रीम देण्यात आला आहे.

तरी संबंधीतास अनुज्ञेय खर्च रूपये 238437=00 चे वैद्यकीय देयक मान्य करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.हरिभाऊ गणपत गायकवाड, मलेरिया मजूर, आरोग्य विभाग यांना हृदयरोग उपचारासाठी अनुज्ञेय असलेला खर्च रूपये 238437=00 चे वैद्यकीय देयक अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्रं. 64 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, सन 2010-2011 या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या असून,

स्वच्छता साहित्यातील एकूण 27 आयटमपैकी मे.न्यु भारत स्टोअर्स-03, रोशन सेल्स कार्पोरेशन-04, मे.इन्शा ट्रेडींग कं.-20 आयटमकरिता दर न्युनत्तम आहेत. त्यानुसार सध्या आवश्यक असलेले 24 आयटम खरेदी करण्यासाठी एकूण रू.13,83,645/- एवढा खर्च येत आहे. एकूण 27 आयटमचे प्राप्त दरास आणि प्रस्तावित खर्चास केंद्रीय खरेदी समितीने शिफारस केली आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2010-2011 या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार स्वच्छता साहित्यातील एकूण 27 आयटमपैकी मे.न्यु भारत स्टोअर्स-03, रोशन सेल्स कार्पोरेशन-04, मे.इन्शा ट्रेडींग कं.-20 आयटमकरिता प्राप्त झालेल्या न्युनत्तम दरानुसार आवश्यक असलेले साहित्य खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या एकूण रू.13,83,645/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. 65 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे की, सन 2010-2011 या वर्षासाठी लागणारे लेखन, ड्राईंग व संगणक साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण 05 निविदा प्राप्त झाल्या असून, लेखन, ड्राईंग व संगणक साहित्यातील एकूण 95 आयटमपैकी मे.विजय जनरल स्टोअर्स-28, मे.न्यु भारत स्टोअर्स-26, मे.स्टर्लिंग कॉम्प्युटर्स ॲन्ड एज्युकेशन ॲन्ड सेल्स ॲन्ड सर्व्हिस-07, मे.अभय ट्रेडर्स-06, मे.ओ.के.ट्रेडर्स-45 आयटमकरीता दर न्युनत्तम आहेत. त्यानुसार सध्या आवश्यक असलेले 79 आयटम खरेदी करण्यासाठी एकूण रू.19,42,540/- एवढा खर्च येत आहे. एकूण 95 आयटमचे प्राप्त दरास आणि प्रस्तावित खर्चास केंद्रीय खरेदी समितीने शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मंजूरी देण्यात यावे.

मा.सभापती : विषय क्रमांक 65 मंजूर करण्यात येतो.

श्री.रेणुकादास वैद्य : सभागृहाच्या ॲग्रीमेंटचा कारणापुरता उतारा त्वरीत देण्याचे मा.सचिव यांना आदेशीत करावे.

मा.सभापती :ताबडतोब देण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2010-2011 या वर्षासाठी लागणारे लेखन, ड्राईंग व संगणक साहित्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या 05 निविदानुसार लेखन, ड्राईंग व संगणक साहित्यातील एकूण 95 आयटमपैकी मे.विजय जनरल स्टोअर्स-28, मे.न्यु भारत स्टोअर्स-26, मे.स्टर्लिंग कॉम्प्युटर्स ॲन्ड एज्युकेशन ॲन्ड सेल्स ॲन्ड सर्व्हिस-07, मे.अभय ट्रेडर्स-06, मे.ओ.के.ट्रेडर्स-45 आयटमकरीता प्राप्त झालेल्या न्युनत्तम दरानुसार आवश्यक असलेले साहित्य खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या एकूण रू.19,42,540/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 66 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क), प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.2 मधील पिसादेवी रोडवरील सुखना नदी पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2009-10 च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये 19,39,953/- चे तयार करण्यात

आले आहे. सदर कामाची तातडी लक्षात घेऊन काम तातडीने हाती घ्यावे म्हणुन मा.महापौर यांनी दिनांक 06/10/2010 रोजी दिलेल्या पत्रात नमुद केले आहे. त्यानुसार सदर कामाचे संदर्भाने मा.महापौर यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने अर्थसंकल्प सन 2010-11 मध्ये तरतुद उपलब्ध करून घेण्यात येईल, यास अधीन राहुन अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केली आहे.

करीता उक्त कामाचे रूपये 19,39,953/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

श्री.रेणुकादास वैद्य : सर्व अंदाजपत्रक मंजूर करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.2 मधील पिसादेवी रोडवरील सुखना नदी पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 19,39,953/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

| | |
|---|---|
| श्री.विकास जैन | :आरोग्य विभागातील 40 पदे भरण्याबाबत शासनाकडुन आदेश आलेले होते का? तसेच सदरील 40 पदे भरलेली आहेत का? |
| मा.सभापती | :आरोग्य अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| श्री.विजय वाघचौरे | :वार्ड ड मध्ये इंजिनिअर देण्याबाबत आदेशित केले होते त्याबाबतीत कुठलीच कार्यवाही झालेली नाही. |
| आरोग्य वै.अधिकारी | :आरोग्य विभागातील रिक्त भदे भरण्याची कार्यवाही अस्थापना विभागाकडून केली जाते. अद्यापपर्यंत पदे भरलेली नाही. ते भरणे आवश्यक आहे. |
| अस्थापना अधिकारी-1 | :आरोग्य विभागाची रिक्त पदांची जाहिरात तयार केलेली आहे. जाहिरात पुटअप करणार आहे. आरसीएच संदर्भात 16 मे 2008 रोजी 38 पदे मंजूर केलेली आहे. महानगरपालिकेच्या अस्थापनेवर जे कर्मचारी आरसीएचवर कार्यरत आहे त्यांचेमधून हि पदे भरण्यात यावी म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे. ती पदे महानगरपालिकेने भरलेली आहे. |
| श्री.विकास जैन | :पदे भरतांना काही प्रोसिजर असेल. कुठलेही शासनाने मंजूर केलेली पदे भरतांना प्रोसिजर असेल. First Cum First असे काही आहे काय? पदे भरण्याची पध्दत काय आहे. |
| अस्थापना अधिकारी-1 | :नविन पदे भरायची असल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 54 (1) अन्वये कमिटी गठीत करण्यात येते. कमिटीमध्ये मा.आयुक्त किंवा त्यांनी पदनिर्देशित केलेले अधिकारी, उपआयुक्त, संबधीत विभागाचे खाते प्रमुख, कमिटी नियमानुसार निवड करून नियुक्ती आदेश देण्यात येते. |
| श्री.विकास जैन | :लोकांना कसे माहित पडते की, येथे पदे भरायची आहे. |
| अस्थापना अधिकारी | :वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येते. |
| श्री.विकास जैन | :पदे भरण्याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती का? |
| अस्थापना अधिकारी | :आरसीएच फेस 1 मध्ये आरोग्य विभागामार्फत पदे भरली गेली. |
| श्री.विकास जैन | :आरसीएच कॉन्ट्रॅक्ट होता, तो संपलेला आहे.राज्य शासनाने जी पदे मंजूरी दिलेली आहे तो आरसीएच कॉन्ट्रॅक्टमध्ये नाही. |
| अस्थापना अधिकारी | :शासन जी.आर. मध्ये स्पष्ट दिलेले आहे. जे आर.सी.एच. मध्ये महानगरपालिकेत कार्यरत आहे. त्याच लोकांना सामावून घेण्यासाठी. |
| श्री.विकास जैन | :राज्य शासनाचा जीआर वाचून दाखविण्यात यावा नावानिशी मंजूरी दिलेली नाही. |
| अस्थापना अधिकारी | :दिनांक 16 मे 2008 चा शासन निर्णय आहे.<br>प्रस्तावना :<br>औरंगाबाद महानगरपालिकेसाठी युरोपियन कमिशनच्या अर्थसहाय्याने प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रम (RCH) मंजूर करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेने 5 रूग्णालयांना श्रेणीवर्धीत करून त्यासाठी 17 वैद्यकीय अधिकारी व इतर अशी एकुण 40 पदे निर्माण करण्यात आली होती. सदरील पदांवर करार पध्दतीने या कार्यक्रम कालावधीसाठी नियुक्त्या केल्या होत्या. या (RCH) |

प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता निर्मित पदांसाठीच्या अनुदानाची मुदत 31.03.2007 रोजी संपुष्टात आल्यानंतर महानगरपालिकेने सदरील प्रकल्प पुढे चालु ठेवून या पदावरील व प्रकल्पांवरील खर्च करण्यास तयारी दर्शवून तसा ठराव पारित केला आहे. त्यानुषंगाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी या कार्यक्रमासाठी निर्माण केलेली आवश्यक ती पदे नियमितपणे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. त्याबाबत संचालक, आरोग्य सेवा / सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय घेवून नियमित पद निर्मितीसाठी लागणारा कालावधी पाहता. या पदावर कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांचे वेतनाचा/मानधनाचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियमित पदनिर्मितीस मान्यता मिळेपर्यंत संबंधित पदावरील कर्मचाऱ्यांना सद्याचे दराने मानधनावर/ठोक वेतन पध्दतीने वेतन अदा करण्यास समक्रमाकांचे दिनांक 23 जानेवारी 2008 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण पुणे यांचे दिनांक 13.03.2008 रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेऊन आणि जननी सुरक्षा योजना, तसेच माता व बाल मृत्यू दरांचे प्रमाण कमी करणे या दृष्टीने राज्याच्या शहरी भागातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील, प्रजनन व बाल आरोग्य या बाबींचे अनन्य साधारण महत्व विचारात घेवून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य विकासासाठी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाची अमंलबजावणी पुढे ठेवण्यासाठी आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मनपा आस्थापनेवर विविध संवर्गातील 40 कायम पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

औरंगाबाद महानगरपालिका विषय क्रं. 655/4, दिनांक 11.01.2007 अन्वये पारित ठरावानुषंगाने, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत विहीत पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका अस्थापनेवर सामावून घेण्यासाठी आरोग्य सेवे अंतर्गत महानगरपालिका अस्थापनेवर विविध संवर्गातील 40 पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम नियमितपणे राबविण्यासाठी मनपाने विषय क्रमांक 655/04 दिनांक 11.01.2007 अन्वये पारित केलेला महासभा ठरावानुषंगाने आयुक्तांनी सादर केलेला प्रस्ताव व अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा, पुणे यांचे अभिप्राय विचारात घेवून, औरंगाबाद मनपाच्या आस्थापनेवर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे विविध संवर्गातील 40 पदे निर्माण करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949च्या

कलम 51(4) मधील तरतुदीस अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

या पदनिर्मिती अनुषंगाने सर्व संविधानिक बाबीची पुर्तता आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी करून तसा अहवाल शासनास सादर करावा.

श्री.विकास जैन :नियमाप्रमाणे म्हणजे काय? नावानिशी आदेश आलेले आहेत काय?

अस्थापना अधिकारी :औरंगाबाद मनपाच्या आस्थापनेवर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी.

श्री.विकास जैन : भरती नियम काय आहे.

अस्थापना अधिकारी : कलम 54 (1) सांगितले आहे. विहीत पध्दतीने, जाहिरात देवुन नियुक्त केलेले आहे.

श्री.विकास जैन :पगार काय देतो.

अस्थापना अधिकारी :शासनाच्या स्केलनुसार पगार देण्यात येतो.

श्री.विकास जैन : मानधनावर घेतलेले होते.

अस्थापना अधिकारी :शासनाने बंद केले होते त्यावेळेस मानधन देत होतो. विहीत पध्दतीने ज्यांना सामावुन घेतलेले आहे.

श्री.विकास जैन :मानधनावर घ्यायचे आहे की, स्केलवर घ्यायचे आहे.

अस्थापना अधिकारी :शासन निर्णयात स्केलवर घेण्याबाबत सांगीतलेले आहे.

श्री.विकास जैन :शासनाने 40 लोकांची नांवे दिलेली नाही.

अस्थापना अधिकारी :कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विहीत पध्दतीने नियुक्त.

श्री.विकास जैन :जी.आरमध्ये स्पष्टपणे आहे की, नियमाप्रमाणे भरती करण्यात यावी.

अस्थापना अधिकारी :नियमाप्रमाणे भरती केलेली आहे.

श्री.विकास जैन :वर्तमानपत्रामध्ये जाहिरात का देण्यात आली नाही.

अस्थापना अधिकारी :जी.आरमध्ये जे कार्यरत आहे त्यांना सामावुन घेण्यासाठी सांगीतलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आरसीएचमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची संख्या माझ्या माहितीनुसार 200 ते 250 आहेत. यापैकी फक्त हे 40 अधिकारी/ कर्मचारी का घेतले त्यासाठी कुठली पध्दत स्विकारली हा प्रश्न स.सदस्यांचा आहे. 40 कर्मचाऱ्यांना घरी जाऊन बोलावले असेल, उर्वरित कर्मचाऱ्यांना कसे कळणार की, महानगरपालिकेत मानधनावर घेतलेले होते आता स्केलवर घेणार आहे कायम करणार आहे ही माहिती त्यांना होणे गरजेचे आहे. यासाठी काय केले ते सांगण्यात यावे.

अस्थापना अधिकारी-1 :जीआरमध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. आरसीएच फेसवन मधील कर्मचाऱ्यांना घेतलेले आहे.

श्री.विकास जैन :सदरील कर्मचाऱ्यांचे शासन निधी/पैसे देणार आहे का? सदरचा बोझा हा महानगरपालिकेवर पडणार आहे. आरसीएच कॉन्ट्रॅक्टवर कर्मचारी कार्यरत होते त्यांचे कामाची गॅरंटी कुणी देऊ शकतो काय? एकाही आदेशमध्ये कर्मचाऱ्यांचे नांव देण्यात आलेले नाही. हे 40 कर्मचारी का दुसरे कर्मचारी का नाही. यांचेच आदेश का काढले.

अस्थापना अधिकारी-1 : जेष्ठतेप्रमाणे नियुक्ती दिली आहे. कमिटीच्या समोर जेष्टता यादी सादर केली होती.

श्री.विकास जैन :जे आदेश काढण्यात आले त्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली आहे का. कुठलीही नियुक्ती, पदोन्नती बाबत माझ्या माहितीप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेच्या समोर आणावे लागते.

अस्थापना अधिकारी-1 :655/04 अन्वये मान्यता दिलेली आहे.

श्री.विकास जैन : कार्यालयीन आदेशात पदांना मंजूरी दिलेली आहे का. पदे मंजूर केली.

श्री.रेणुकादास वैद्य : नियुक्ती दिलेल्याच 40 कर्मचाऱ्यांना घेण्यात यावे म्हणुन आदेशात किंवा ठरावात म्हटलेले नाही. या 40 जणांना का म्हणुन घेण्यात आलेले आहे. त्या 40 लोकांचे कागदपत्र तपासले आहे. नावानिशी सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आरसीएच्या 250 पैकी 40 जणांना नियुक्ती दिली बैठकीत यास मंजूरी घेण्याची गरज आहे काय नेहमीप्रमाणे कार्योत्तर मंजूरी का नाही घेण्यात आली. खुलासा करण्यात यावा. याची गरज आहे की, नाही.

श्री.विकास जैन :पदे भरल्यानंतर मान्यतेस्तव सभेपुढे ठेवावे लागते. माहितीस्तव तरी ठेवावे लागते. आदेशात 40 जणांची नांवे असल्यास माझी काहीही हरकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : 40 पदांना मान्यता दिली ही मंजूरी शासनाने दिली या 40 लोकांना 54 (1) प्रमाणे समिती गठीत करून समितीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या यादीला सभागृहाची मान्यता घ्यायला हवी होती. अशी तरतुद आहे काय?

अस्थापना अधिकारी-1 :मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव झालेला आहे. शासनाने मंजूरी दिली.

श्री.विकास जैन : 40 लोकांची नांवे दिलेली नाही. आपण 40 लोक ठरवले त्याची मान्यता घेतली आहे का. शासनाचे नांव घेवू नका. पदांची जाहिरात का देण्यात आली नाही. 40 जणांची नांवानिशी मान्यता घेतलेली आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य :नियुक्तीच्या वेळेस एखादयावर अन्याय होवु शकतो. आरक्षणाचा प्रश्न येवु शकतो. मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याची गरज आहे किंवा नाही खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :दोन ते तीन जणांची कमिटी स्थापन करून चौकशी करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वसाधारण सभेमध्ये पॉलिसी ठरवून घ्यायची सर्वसाधारण सभेचे सर्व अधिकार काढून घ्यायचे. मा.आयुक्त, मा.महापौर यांना द्यायचे हरकत नाही. 54 (1) खाली समिती गठीत केली त्यासही हरकत नाही. परंतु ज्यावेळेस 250-300 लोकांपैकी 40 लोकांचे सलेक्शन करतात. काही चिरीमीरी घेऊन 40 जणांना नियुक्त्या दिल्यात का? तसा काही प्रकार झालेला आहे का? आमची विनंती आहे की 99 सदस्यांचे सभागृह आहे 99 जणांच्या समोर सभागृहात यादी ठेवुन ती योग्य आहे किंवा नाही हे ठरवु द्या. चिरीमिरी घेऊन नियुक्त्या केल्या असतील, नातेवाईक असतील. आम्हालाही कळवु द्या की बरोबर आहे किंवा नाही. सभागृहाची मंजूरी न घेता नियुक्तीची अधिकार दिले आहेत का? असे कोणी म्हटले आहे का कुठल्याही सभागृहाची मान्यता/मंजूरी न घेता नियुक्ती आदेश काढायचे. कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक होते.

श्री.विकास जैन :कार्यात्तर मंजूरीसाठी ठेवल्यास कुठला नविन अधिकारी/कर्मचारी महापालिकेत आले आहे याची माहिती मिळते.

मा.सभापती :स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहे त्यासंबधी मुख्यलेखापरिक्षक व उपअभियंता श्री.काझी यांची चौकशी समितीवर नियुक्ती करण्यात येते त्यांनी प्रत्येक बाबींची तपासणी करून येणाऱ्या स्थायी समितीमध्ये अहवाल ठेवण्यात यावा.

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

स्थायी समितीने नियुक्त केलेल्या चौकशी समिती
संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| स्था.स.सभेचा दिनांक | चौकशी संबंधीचा विषय/तपशील | चौकशी समितीचे सदस्य | अहवाल प्राप्त आहे किंवा नाही |
|---|---|---|---|
| 07/09/2010 | सिटी सर्व्हे नं.11136 श्री.स.हबीबउद्यीन स.बुऱ्हानोद्यीन (मोसीन टॉवर) रोशनगेट येथील अनधिकृत इमारती संदर्भात चौकशी करून अहवाल देणे | उपआयुक्त (म), स्थायी समितीचे सदस्य श्री.अ.साजेद, श्री.मधुकर सावंत व श्री.रेणुकादास वैद्य | अप्राप्त |
| 25-10-2010 | आरसीएच प्रकल्पांतर्गत कार्यरत असणाऱ्या 250 पैकी 40 जणांना कायम नियुक्ती दिली या संदर्भात चौकशी करून अहवाल देणे. | मुख्य लेखापरिक्षक व उपअभियंता श्री.काझी | अप्राप्त |
| 06-12-2010 | खाम नदीच्या पात्रातील अनधिकृत भुखंड पाडणे इ.बाबत चौकशी करून अहवाल देणे | शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मालमत्ता अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, स्था.स.सदस्य सर्वश्री अमीत भुईगळ, अ.साजेद अ.सत्तार, गाजी जुबेर, जगदीश सिध्द. | अप्राप्त |